# **जाहीर निवेदन**

ग्रामविकास व पंचायत राज विभागांतर्गत सोलापूर जिल्हा परिषदांतर्गत गट-क मधील १७ संवर्गातील एकूण ६७४ इतकी रिक्त पदे सरळसेवेने भरण्याबाबतची जाहिरात दि. 05 ऑगस्ट 2023 रोजी प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. सदर जाहिरातीसाठी दि. 05 ऑगस्ट 2023 ते दि. 25 ऑगस्ट 2023 पर्यंत ऑनलाईन पद्धतीने उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात आलेले आहेत. सदर परीक्षेची संपूर्ण भरतीप्रक्रिया शासनाने मान्यता दिलेल्या आय.बी.पी.एस. या कंपनीमार्फत राबविण्यात येत आहे. त्यामुळे सदर परीक्षा अत्यंत पारदर्शक व काटेकोर पद्धतीने होणार आहे. तथापि, काही समाज विघातक प्रवृत्तीच्या व्यक्तींकडून प्रलोभन दाखवून आर्थिक फसवणूक होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी अशा फसवणुकीपासून उमेदवारांनी दक्षता घ्यावी, तसेच अशा प्रकारच्या कोणत्याही प्रलोभनास बळी पडू नये, अन्यथा अशी फसवणूक झाल्यास शासन अथवा जिल्हा परिषद जबाबदार राहणार नाही. अशा प्रकारे कोणतीही व्यक्ती परीक्षेसंदर्भात आर्थिक मागणी करीत असल्याबाबत निदर्शनास आल्यास त्यांच्याविरुद्ध जवळच्या पोलिस स्टेशनमध्ये तक्रार दाखल करण्यात यावी, असे सर्व उमेदवारांना आवाहन करण्यात येत आहे.

**(स्मिता म पाटील)**
जिल्हा निवड समिती सदस्य सचिव तथा
उपमुख्य कार्यकारी अधिकारी(सा)
जिल्हा परिषद,सोलापूर

**(मनिषा आव्हाळे,भाप्रसे)**
जिल्हा निवड समिती सदस्य तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद,सोलापूर

**(कुमार आशीर्वाद,भाप्रसे)**
जिल्हा निवड समिती अध्यक्ष तथा
जिल्हाधिकारी,सोलापूर